# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. 106/२०२५

**विषय : विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग, प्रशाकीय कार्यालये, वसतिगृहे येथील निर्लेखित केलेल्या निरुपयोगी व वापरायोग्य नसलेल्या वस्तू, फर्निचर, ई–वेस्ट, विद्युत साहित्य, प्लास्टिक इत्यादींचा लिलाव करणेबाबत.**

**संदर्भ :** दि. ०४/०४/२०२५ रोजीची लिलाव समितीची सभा

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सन २०२५–२६ साठी विषयांकित साहित्यांच्या लिलावाची प्रक्रीया मे, २०२५ मध्ये करण्याचे नियोजन केले आहे.

तरी वित्त विभागाचे परिपत्रक क्र. २४२/२००९ व दि. २६/१२/२०१५ चे पत्रक क्र. Fin/2015-16/2107 अनुसार सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग/शाखांमधील समितीने सदर वस्तूंची यादी तयार करावी व प्रमाणपत्राद्वारे सदर वस्तू उपयोगी तसेच दुरुस्तीस योग्य नाहीत, असे नमुद करुन मा. वित्त व लेखा विभागामार्फेत सदर प्रस्तावास मा. कुलगुरु यांची मान्यता घ्यावी व सदर प्रस्ताव पुढील प्रक्रियेकरीता दि. ०४/११/२०२४ पर्यंत कार्यकारी अभियंता (प्रकल्प), स्थावर विभाग यांचेकडे पाठवावेत असे सुचित करण्यात आलेले होते.

केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाचे मार्गदर्शक तत्वानुसार ई–वेस्ट वस्तू जसे संगणक, प्रिंटर, एलसीडी मॉनिटर्स, प्रयोगशाळेतील विविध इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रोमॅकॅनिकल उपकरणे इ. वस्तूंचे वर्गीकरण वेगळे करणे आवश्यक असून सदर ई–वेस्ट योग्य परवानाधारक लिलाव धारकाला विकणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रस्ताव देताना ई–वेस्ट व फर्निचरची वेगवेगळी यादी स्थावर विभागाकडे पाठविण्यात यावी. ई–वेस्ट तसेच फर्निचर व इतर तत्सम वस्तूंचे लॉट आपल्या विभागातच वेगवेगळे करण्यात यावे व त्यानुसार सदर वस्तू उचलल्या जातील. तरी दि. ०४/११/२०२४ पुर्वी आपले प्रस्ताव वर नमुद केल्याप्रमाणे पाठविण्यात यावे असे कळविण्यात आलेले होते. दि. ०४/११/२०२४ ही अंतिम मुदत देण्यात आलेली होती. त्यानंतर लिलावासाठी आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही असे सुचित करण्यात आलेले होते त्यास आता दिनांक २१/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

C:\Users\admin\Desktop\2016\Letters----\Marathi Letters\Marathi Letter........

तथापि आपल्या विभागातील भंगार मालाचा प्रस्ताव निरंक असल्यास तसे स्थावर विभागास कळविण्यात यावे, ही विनंती.

विभागातील भंगार साहित्याचे लिलावाचे प्रस्ताव या कार्यालयास **दि. २१/०४/२०२५** पूर्वी प्राप्त न झाल्यास व आपल्या विभागातील भंगार साहित्याचा निपटारा न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील याची नोंद घेण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता (प्रकल्प)**

प्रत माहितीसाठी:—

१. मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
३. मा. वित्त व लेखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
४. मा. प्रा. डॉ. विजय खरे (अध्यक्ष, लिलाव समिती, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)